**<u>नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०२३</u>**

(नारायण विरुध्द सुमित्राबाई व ईतर)

**<u>निशाणी क्र.२३ लगत</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. एस.एस. शर्मा यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u> –**

**०२.** मी प्रकरणात फेरिस्त नि.क्र. २५/१ नुसार मालमत्ता क्र. ०८०००२८८ नगरपरिषद सावनेर ची कर भरणा केल्याची पावती दाखल केली आहे. सदर पावतीस **नि.क्र. २९** देण्यात येते. तसेच फेरिस्त नि.क्र. २५/२ नुसार मालमत्ता क्र. ०८०००२८८ नगरपरिषद सावनेर कर आकारणी उता–याची प्रत दाखल केली आहे. सदर उता–यास **नि.क्र. ३०** देण्यात येते. फेरिस्त नि.क्र. २५/३ नुसार भुमापण क्र. ३२३ सावनेर चे मालमत्ता प्रत्रक दाखल केले आहे. सदर पत्रकास **नि.क्र. ३१** देण्यात येते. फेरिस्त नि.क्र. २५/४ नुसार सि.स. नं. ३२३ चा नझूल नकाशा दाखल केला आहे. सदर नकाशास **नि.क्र. ३२** देण्यात येते.

**०३** सदर प्रकरण दाखल करण्यापूर्वी मी प्रतिवादी यांना माझ्या वकिलांतर्फे पाठविलेली नोटिस व त्याच्या पोचपावत्या फेरिस्त नि.क्र. ४ खाली दाखल केल्या आहेत. आता मला फेरिस्त नि.क्र. ४/५ वरिल नोटिसची स्थळप्रत दाखवली, त्यावर माझा अंगठा आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे. नोटिसच्या स्थळप्रतिस **नि.क्र.३३** देण्यात येते. सदरच्या नोटिसा प्रतिवादी यांना मिळाल्याबाबत पोहोचपावत्या फेरीस्त नि.क्र.४/६ वर एकूण सहा पोचपावत्या दाखल केल्या आहेत. त्यांना अनुक्रमे **नि.क्र. ३४ ते ३९** देण्यात येते.

**०४. सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादींतर्फे–**

**०५.** प्रतिवादी क्र. १ ते ५ तसेच त्यांच्या विद्वान विधिज्ञांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब सदर प्रतिवादीतर्फे उलटतपास काही नाही. तसेच प्रस्तूत

प्रकरण प्रतिवादी क्र. ६ यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात येत असल्यामुळे प्रतिवादी क्र. ०६ यांच्यातर्फे देखील उलटतपास काही नाही.

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत,

THAKUR PRADEEPSINGH

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2025.09.19 14:48:29 +0530

सावनेर

(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)

**दिनांक –१८/०९/२०२५**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**

सावनेर.